## Indian Academy of Pediatrics (IAP)

### महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

**प्रकरण ३४ :**

# जीवाणूमुळे होणारा गंभीर संसर्गजन्य आजार कसा ओळखावा ?


अध्यक्ष २०२२ : **डॉ. हेमंत गंगोलिया**
सचिव २०२२-२३ : **डॉ. अमोल पवार**
मार्गदर्शक : **डॉ. जयंत उपाध्ये**
समन्वयक : **डॉ. नरेंद्र नानीवडेकर**
अनुवादक : **डॉ. चंद्रशेखर दाभाडकर**
पुनरावलोकन : **डॉ. उज्ज्वला गवळी**
**श्रीमती उज्ज्वल करमळकर**

*Convener:* **S Balasubramanian**
*Members:* **Raju C Shah, PS Pawan Kalyan, Tanu Singhal**
*Reviewer:* **Ajay Kumar Gupta**





लहान मुलांमध्ये ताप आल्यावर डॉक्टरांना काळजी असते की, हा ताप कोणत्या गंभीर जंतूसंसर्गाचा तर परिणाम नाही ना? कारण वेळेत हे ओळखले नाही तर अतिशय गंभीर परिस्थिती उत्पन्न होऊ शकते. हा गंभीर प्रकार कसा ओळखायचा आणि त्यावर काय उपचार करायचे, ह्याची चर्चा केली आहे.


**आपल्या पाल्याला जीवाणूमळे होणारे गंभीर संसर्गजन्य आजार कसे ओळखावे ते पुढील प्रमाणे :-**

प्र.१ गंभीर जीवाणू संसर्ग **(SBI)** म्हणजे काय ?

प्र.२ पालकांनी याबद्दल जाणून घेणे महत्वाचे का आहे ?

प्र.३ सेप्सिस म्हणजे काय ?

प्र.४ मुलांमध्ये या जीवाणू संसर्गामुळे सामान्यतः कुठले गंभीर आजार होऊ शकतात ?

प्र.५ गंभीर जीवाणू संसर्गाची लक्षणे कोणती ?

प्र.६ या संदर्भात पालकांना कुठली धोक्याची चिन्हे माहित असणे आवश्यक आहेत.

प्र.७ साधारणतः कोणत्या मुलांना अशा जीवाणूपासून गंभीर संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता असते ?

प्र.८ गंभीर जीवाणू संसर्गाची लक्षणे आढळल्यास पालकांनी काय करावे आणि काय करु नये ?

प्र.९ असे जीवाणूमुळे होणारे गंभीर संसर्गजन्य आजार टाळण्यासाठी पालकांनी काय करावे ?

प्र.१० पालक गंभीर जीवाणू संसर्गजन्य आजार लवकर ओळखू शकतील अशी काही प्रारंभिक लक्षणे किंवा चिन्हे कोणती आहेत ?


**Under the Auspices of the IAP Action Plan 20202021**

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 20202021
**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

**Core Group**

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# जीवाणूमुळे होणारा गंभीर संसर्गजन्य आजार कसा ओळखावा ?

प्र.१

## गंभीर जीवाणू संसर्ग (SBI) म्हणजे काय?

काही जीवाणूंच्या गंभीर संसर्ग आजारात मेंदू, फुफ्फसे, हृदय, मूत्रपिंड, हाडे आणि सांधे यासारख्या महत्वाच्या अवयवांना संसर्ग (इन्फेक्शन) होतो. यामध्ये रक्तात हा संसर्ग दिसून येतो किंवा दिसून येतही नाही. या आजारांची चिन्हे सहसा तापापासून सुरू होतात.

प्र.२

## पालकांनी याबद्दल जाणून घेणे महत्वाचे का आहे?

सामान्य सर्दीसारख्या विषाणूंचे आजार (व्हायरल इन्फेक्शन्स) अचानक बरे होतात. या उलट जीवाणूच्या संसर्गामुळे शरीरातील महत्वाच्या अवयवांवर लक्षणीय परिणाम होऊन मुलांच्या प्रकृतीवर दीर्घकालीन गंभीर परिणाम होऊ शकतो किंवा मुलाच्या दैनंदिन जीवनावर यांचा कायम स्वरुपी परिणाम दिसू शकतो. लवकर निदान आणि योग्य प्रतिजैविकांचा (antibiotics) वापर यामुळे या आजारांच्या अनेक दुष्परिणामापासून मुलांचे संरक्षण करता येते. एवढेच नाही तर उपचारा-करीता अनेक दिवस रुग्णालायामध्ये राहणे व क्वचित मृत्यू होणे टाळता येते. याकरिता या संसर्गजन्य आजारांचे लवकर निदान आणि लवकर योग्य ते उपचार करण्यासाठी समाजात जागरुकता आवश्यक आहे.

प्र.३

## सेप्सिस म्हणजे काय?

सेप्सिस (रक्तातील संसर्ग) ही आजाराची एक गंभीर परिस्थिती असून त्यात मृत्यूचा धोका उद्भवू शकतो. सामान्यतः असा संसर्ग झाला की आपले शरीर या संसर्गाचा प्रतिकार करण्याकरिता शरीरात वेगवेगळी रसायने तयार करते. क्वचित प्रसंगी आणीबाणीच्या परिस्थितीत या रसायनांचा शरीरावर विपरीत गंभीर परिणाम होतो आणि अनेक अवयव निकामी होऊन एक संभाव्य जीवघेणी

## प्र.४

### मुलांमध्ये या जीवाणू संसर्गामुळे सामान्यत: कुठले गंभीर आजार होऊ शकतात?

- मेनिंजायटीस (मस्तिष्कदाह) मेंदूच्या आवरणाचा संसर्ग. अनेकदा याचा परिणाम मेंदूवर होतो.
- न्यूमोनिया (फुफ्फुसाचा गंभीर संसर्ग)
- हाडांचा आणि सांध्यांचा संसर्ग (ऑस्टियोमायलिटिस आणि आर्थरायटिस)
- मूत्रमार्गाचा संसर्ग (मूत्रपिंडाचा संसर्ग) "पायलोनेफ्राइटिस"
- रक्तातील संसर्ग (बॅक्टेरेमिया) आणि सेप्सिस (गंभीर लक्षणासहीत रक्तातील संसर्ग)
- गळू (शरीरात किंवा अवयवांमध्ये पू-युक्त सूज)

## प्र.५

### गंभीर जीवाणू संसर्गाची लक्षणे कोणती ?

३ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या बालकांमध्ये इतर कोणत्याही लक्षणांशिवाय ताप (१०२° फे. पेक्षा जास्त) येणे हे गंभीर संसर्गाचे लक्षण असू शकते. शिवाय संसर्गाची शक्यता दाखविते.

- उत्तेजना दिल्याशिवाय सांध्यांची हालचाल न होणे, सुजलेले सांधे अथवा हाडावर सूज
- खाणे, पिणे बंद होणे किंवा कमी होणे (भूक कमालीची मंदावणे)
- ताप सातत्याने १०२° फे पेक्षा जास्त किंवा ९६° फे पेक्षा कमी असणे.
- छातीत खूप दुखणे
- आकडी (फिट) येणे
- ओठांचा रंग निळसर होणे
- सतत उलट्या होणे (तीन वेळेस खायला दिल्यानंतर ३० मिनीटांच्या आत बाळाने खाल्लेले सगळे अन्न उलटून टाकणे)
- अत्यंत सुस्ती येणे किंवा खूप चिडचिड करणे, सतत असह्य रडणे.
- उद्दीपनाला अतिशय कमकुवत प्रतिसाद

## प्र.६

### या संदर्भात पालकांना कुठली धोक्याची चिन्हे माहित असणे आवश्यक आहेत?

- पाणी किंवा पातळ पदार्थ कमी खाणे.
- लघवीचे प्रमाण कमी होणे (६ पेक्षा कमी डायपर भिजणे).
- घश्यातून घरघर आवाज येणे.
- हालचाल मंदावणे किंवा चिडचिड, अस्वस्थ होणे.
- तापाची औषधे देऊनही ५ दिवसांपेक्षा जास्त दिवस ताप कायम असणे.
- श्वासाची गती वाढणे किंवा श्वास घेण्यास खूप त्रास होणे.
- लालसर, जांभळे पुरळ / डाग उठणे
- हात, पाय, थंड पडणे.
- लघवीला घाण वास येणे किंवा खूप गडद होणे.
- टाळूला सूज येणे
- उत्तेजना दिल्यानंतरही(stimulation) प्रसिसाद न देणे (बेशुद्धावस्था)
- झटका येणे (फिट)
- बाळाच्या जन्माच्या वेळेस त्रास झाल्याची, गुदमरण्याची, गुंतागुंतीची (complications) माहिती, विशेष दक्षता कक्षात ॲडमिट केल्याची माहिती

## प्र.७

### साधारणतः कोणत्या मुलांना अशा जीवाणूपासून गंभीर संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता असते?

सर्वसाधारणपणे लहान मुले आणि खाली नमूद केलेल्या मुलांना (त्यांच्या रोगप्रतिकारक शक्तीच्या अपरिपक्वतेमुळे) गंभीर संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता अधिक असते.

- जन्मतः कमी वजनाची बाळे प्रतिकारशक्ती कमी असणाऱ्या आजाराची मुले, कुपोषण, दुर्धर आजाराची मुले. लसीकरण न झालेली मुले आणि जन्मजात विविध अवयवांचे व्यंग असणारी मुले यांना जीवाणूपासून गंभीर संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता जास्त असते.

## प्र.८

## गंभीर जीवाणू संसर्गाची लक्षणे आढळल्यास पालकांनी काय करावे आणि काय करु नये?

**हे करा :-**

- मुलाला हॉस्पीटलमध्ये नेण्याचे सुचविल्यास फोनद्वारे डॉक्टर/आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांशी त्वरित संपर्क साधा.
- खूप वेदना किंवा खूप ताप असल्यास योग्य डोसमध्ये पॅरासिटामॉल नावाचे औषध द्या.
- खूप उलट्या होत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उलटीचे औषध द्या आणि भरपूर द्रव द्या.

**हे करु नका :-**

- स्वतःच्या मनाने प्रतिजैविक (antibiotics) देणे.
- थंड पाण्याने, कोलोन वॉटरने, कापूर किंवा तेलाने चोळणे.
- वैद्यकीय मदत मिळविण्यात विलंब करु नका.

## प्र.९

## असे जीवाणूमुळे होणारे गंभीर संसर्गजन्य आजार टाळण्यासाठी पालकांनी काय करावे?

- लसीकरणः एच. इन्फ्लूएझा, न्यूमोकोकल, एमएमआर, चिकनपॉक्स, पोलिओमायलिटिस आणि डिप्थीरिया, पेर्ट्युसिस (डांग्या खेकला), आणि टिटॅनस (धनुर्वात) या प्रकारच्या अनेक लसी काही या आजाराच्या प्रतिबंधासाठी उपयुक्त आहेत.
- पहिले ६ महिने फक्त स्तनपान आणि नंतर किमान १ वर्ष इतर आहाराबरोबर स्तनपान चालू ठेवल्यास रोग प्रतिकारशक्ती वाढेल आणि पचन संस्थेचे आणि श्वसन संस्थेचे गंभीर संसर्गजन्य आजार टाळता येतील.
- चांगला, पौष्टीक आणि संतुलित आहार रोगप्रतिकारक शक्ती सुधारतो.
- संसर्गजन्य आजार असलेल्या इतर लहान मुलांचा संपर्क टाळणे ही एक महत्वाची पायरी आहे.
- हाताची योग्य स्वच्छता राखा.
- बाटलीतून आहार देणे टाळा.

## प्र.१०

## पालक गंभीर जीवाणू संसर्गजन्य आजार लवकर ओळखू शकतील अशी काही प्रारंभिक लक्षणे किंवा चिन्हे कोणती आहेत?

- सातत्याने १०२° फे पेक्षा जास्त ताप, विशेषत: ३६ महिन्यांपेक्षा कमी वयोगटातील मुलांमध्ये ताप (बाकी कोणतीही लक्षणे नसली तरी) हे धोक्याचे लक्षण आहे.
- सातत्याने येणारा ताप व यापूर्वी वर सांगितल्याप्रमाणे कुठलीही धोक्याची लक्षणे दिसल्यास त्वरीत वैद्यकीय सल्ला घ्यावा.